महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७५ वे | दिनांक : ०८/०३/२०२६ | वार : रविवार

## जागतिक शांततेसाठी भारताने पुढाकार घ्यावा : अण्णा हजारेंचे पंतप्रधान मोदींना पत्र



**अहिल्यानगर :** इराण आणि इस्त्रायल-अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या भीषण लष्करी संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे. जागतिक स्तरावर वाढत्या तणावामुळे मानवतेला धोका निर्माण झाला असून, भारताने शांततेसाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी अण्णांनी या पत्राद्वारे केली आहे. गेल्या आठवडाभरात मध्यपूर्वेत तणाव कमालीचा वाढला असून, युद्धाचे ढग गडद झाले आहेत.

गेल्या आठवड्यापासून मध्यपूर्वेत तणाव कमालीचा वाढला आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानवर केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्यासह अनेक वरिष्ठ लष्करी अधिकारी मारले गेले आहेत. याला प्रत्युत्तर म्हणून इराणने मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांवर क्षेपणास्त्रांचा वर्षाव केला आहे. आठवडा उलटूनही हा संघर्ष थांबण्याची चिन्हे दिसत नसल्याने जगभरातून चिंता व्यक्त होत आहे. आता या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहीत उपरोक्त आवाहन केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात अण्णा हजारे यांनी जगातील सध्याच्या परिस्थितीवर सखोल चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणतात, "सध्या जग अत्यंत चिंताजनक परिस्थितीतून जात आहे. विविध देशांमधील संघर्षामुळे सामान्य नागरिकांचे जीवन असुरक्षित बनले आहे. युद्धात निष्पाप महिला, मुले आणि कुटुंबांना सोसाव्या लागणाऱ्या यातना अत्यंत वेदनादायक आहेत. भारताची संस्कृती ही अहिंसा आणि शांततेची राहिली आहे. आपण नेहमीच जगाला संवादाचा मार्ग दाखवला आहे, त्यामुळे या कठीण काळात भारताने शांततेचा संदेश देणे गरजेचे आहे."

अण्णा हजारे यांनी पत्रात संवादाच्या महत्त्वावर भर दिला आहे. "आज जगाला अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची नाही, तर एकमेकांवरील विश्वासाची आणि संवादाची गरज आहे. युद्धामुळे केवळ विनाश होतो, मात्र संवादातूनच कायमस्वरूपी समाधान आणि स्थिरतेचा मार्ग निघू शकतो. भारताने एक जबाबदार आणि मोठी लोकशाही म्हणून जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, ही माझी नम्र प्रार्थना आहे," असे त्यांनी नमूद केले.

"पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भारताने अनेक जागतिक प्रश्नांवर सकारात्मक भूमिका बजावली आहे. या संवेदनशील वेळी जर भारत माणुसकी आणि शांततेच्या बाजूने खंबीरपणे उभा राहिला, तर ते संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी ठरेल," अशी अपेक्षा अण्णा हजारे यांनी पत्राच्या शेवटी व्यक्त केली आहे.

## रोहित पवारांच्या साखर कारखान्यामुळे दादांचा अपघात?



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेप्रकरणी अवघ्या राज्याचे रान पेटवले आहे. त्यांनी अजित पवारांचा मृत्यू हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्यांनी वेगवेगळे पुरावे व तांत्रिक माहिती समोर आणली आहे. पण आता भाजप युवा मोर्चाच्या एका पदाधिकाऱ्याने अजित पवारांच्या विमान अपघातासाठी रोहित पवारांचाच साखर कारखाना जबाबदार असल्याचा दावा करत एकच खळबळ उडवून दिली आहे. या पदाधिकाऱ्याने या प्रकरणाची सखोल तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली आहे.

भाजप युवा मोर्चाचे पुणे जिल्हाध्यक्ष वैभव सोलनकर यांनी अजित पवारांच्या विमान अपघाताचा संबंध आमदार रोहित पवार यांच्या साखर कारखान्याशी जोडला आहे. त्यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. त्यात त्यांनी रोहित पवारांच्या साखर कारखान्यातून निघणाऱ्या धुरामुळे बारामती परिसरातील दृश्यमानता कमी होऊन हा अपघात झाल्याचा संशय व्यक्त केला आहे.

सोलनकर यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, पुणे जिल्ह्यातील शेठफळ गडे येथे रोहित पवार यांच्याशी एक साखर कारखाना आहे. या कारखान्यामुळे स्थानिक नागरिकांना श्वसनाचे आजार, डोळ्यांची जळजळ व त्वचेच्या तक्रारी भेडसावत आहेत. त्याचा शेतीवरही परिणाम होत आहे. अजित पवारांचा अपघात झाला त्या दिवशी बारामती परिसरात या कारखान्याच्या धुरामुळे कमी दृश्यमानता होती का? औद्योगिक उत्सर्जनामुळे कृत्रिम धुके तयार झाले होते का? याची वैज्ञानिक तपासणी होणे आवश्यक आहे. विशेषतः रोहित पवार यांनी स्वतः कारखान्याचा धूर विमानतळासाठी अडथळा ठरतो की नाही याचे सादरीकरण करावे, असे त्यांनी म्हटले आहे.दुसरीकडे, रोहित पवारांनी आज दिल्लीत आपचे राष्ट्रीय संयोजक तथा दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. ते या भेटीची माहिती देताना म्हणाले, अरविंद केजरीवाल यांची भेट घेऊन आज अजितदादांच्या विमान अपघातावर चर्चा केली. गेल्या काही दिवसांपासून याबाबत जमा केलेल्या संपूर्ण माहितीचं प्रेझेंटेशन त्यांना दिले. त्यांनीही याबाबतचे सगळे तपशील बारकाईने समजून घेतले. अजितदादांना न्याय मिळण्यासाठी आणि देशात अशी दुर्घटना पुन्हा घडू नये आणि त्यात कुणाचाही बळी जाऊ नये यासाठी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, त्यासाठी या विषयावर 'आप'च्या खासदारांनी संसदेत आवाज उठवावा अशी विनंतीही त्यांना केली. त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत या लढ्यात सोबत असल्याचा विश्वास दिला.दरम्यान ,रोहित पवारांनी आप खासदार संजय सिंह यांचीही आज भेट घेतली. त्यांनाही त्यांनी अजित पवारांच्या विमान दुर्घटनेशी संबंधित तांत्रिक त्रुटी व इतर गोष्टींची माहिती दिली. यावेळी संजय सिंह यांनी त्यांना अजितदादांना न्याय मिळण्यासाठी या विषयावर राज्यसभेत आवाज उठवण्याचे आश्वासन दिले.

## महिलांच्या तक्रारींसाठी पोर्टलचे अनावरण : एका क्लिकवर नोंदवता येणार तक्रार

**मुंबई :** जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी महिलांची सुरक्षा, हक्क आणि आत्मनिर्भरता या विषयांवर मान्यवरांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या 'महिला सन्मान पोर्टल'चे अनावरण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या पोर्टलच्या माध्यमातून आता महिलांना घरबसल्या एका क्लिकवर आपली तक्रार नोंदवता येणार आहे. हे पोर्टल थेट पोलिस यंत्रणेशी जोडलेले असल्याने तक्रारीची दखल तात्काळ घेतली जाईल आणि संबंधित विभागामार्फत पीडित महिलांना त्वरित न्याय मिळवून दिला जाईल, असा विश्वास सुनेत्रा पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आपल्या भाषणात समाजातील पुरुषी मानसिकता बदलण्याची गरज अधोरेखित केली. महिलांच्या अस्तित्वाच्या लढाईत जेव्हा पुरुष बांधव खांद्याला खांदा लावून उभे राहतात, तेव्हा ही लढाई जिंकण्याचे बळ अधिक मिळते, असे त्या म्हणाल्या. तसेच, महिलांना केवळ धार्मिक पोथ्या-पुराणात न अडकवता त्यांना संविधानाची जाणीव करून देणे आवश्यक आहे. मुलीला सासरी पाठवताना तिच्या हातात 'संविधान' द्या, जेणेकरून तिला आपल्या हक्कांची प्रबळ जाणीव होईल, असे आवाहनही त्यांनी पालकांना केले.महिला सुरक्षेबाबत बोलताना चाकणकर यांनी आयोगाच्या कामगिरीचा आढावा मांडला. गेल्या वर्षभरात मानवी तस्करीच्या मोठ्या जाळ्यातून ७२ महिलांची सुटका करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बदलापूर येथील स्त्रीबीज विक्री प्रकरण आणि ठाणे, जळगाव, नाशिक येथील अवैध वैद्यकीय केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. महिलांनी आपल्या कार्यस्थळी अंतर्गत तक्रार समिती आहे का याची खात्री करावी आणि मोबाईलमधील 'पॅनिक बटण'चा वापर करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ मार्च २०२६


## परिवर्तनवादी चळवळीस पठारावस्था आलेली आहे?

आधुनिक महाराष्ट्राची जडण - घडण होण्याच्या पाठीमागे समग्र परिवर्तनाची बांधिलकी जपणाऱ्या म. फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षि वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक समाजधुरिणांच्या कार्याचा मोठा वाटा आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात नारायण मेघाजी लोखंडे, गोपाळबाबा वलंगकर अशा बोटावर मोजण्याइतक्या व्यक्तींनी मागासलेल्या, निरंतर विषमता आणि दारिद्र्याच्या खाईत खितपत पडलेल्या लोकात आपल्या वाणी आणि लेखणीने एक स्फुल्लिंग चेतविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र विचार म्हणजे तत्कालीन समाजात ऊर्जास्रोत होते. त्यामुळे तत्कालीन बहुजन समजात एक प्रकारची ऊर्जा निर्माण झाली होती. श्री चक्रधर स्वामी, संत कबीर, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज आदींनी महाराष्ट्रभर भटकंती करीत लोकभाषेत परिवर्तनाचे विचार रुजविण्याचे काम केले. आजही सप्तखंजेरीवादक सत्यपाल महाराजांसारखे काही पोटतिडकीने बोलतात, गातात. सद्यस्थितीत बहुजन समाजात जागृती होण्यामागे सत्यशोधक, ब्राम्हणेतर आणि दलित चळवळीचेही मोठे योगदान आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकर आदींनी आपल्या कलेच्या माध्यमातून जनमानसात अस्मिता रुजविण्याचे कसोशीने प्रयत्न केले. संत मंडळींनी आपल्या विचार आणि कृतीतून समाजातील अंधश्रद्धा आणि तत्कालीन अनिष्ट प्रथा परंपरा यांचे समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. 'प्रबोधन'कार ठाकरे यांनी तहहयात येथील अनिष्ट परंपरेवर ताशेरे ओढले. या पृष्ठभूमीवर मराठवाड्यात आणि एकूणच महाराष्ट्रात जी मन्वंतरं घडून आलीत त्याच्या अनेक कारणांपैकी परिवर्तनाचा विचार पेरणारी माणसं इथं जन्माला आली, हे एक कारण होय. साठोत्तरीच्या कालखंडात दलित पँथरने सामाजिक क्षेत्रातील गैरप्रकारांवर घणाघात घालत आपले अस्तित्व सिद्ध केले. सामाजिक स्तरावर एक वेगळा दबदबा निर्माण केला. त्या काळात पँथरचे नाव घेतले की, भ्रष्टाचारी अधिकारीवर्ग थरथर कापत असे. शहरी भागात झोपडपट्ट्या वसविण्याचा मुद्दा असो, महागाई निर्देशांकाप्रमाणे शिष्यवृत्ती वाढीचा असो, मंडल आयोग लागू करण्यासाठीचा लढा असो वा नामांतर लढा असो, कार्यकर्ते जीव ओतून काम करायचे. कालांतराने नेते - कार्यकर्ता मंडळीच्या मनावर राजकारणाचे गारूड निर्माण होऊन राजकारणासाठी समाजकारण असे समीकरणच जणू रूढ झाले. एके काळचा आक्रमक पँथर मऊसूत बनून सत्तेच्या एखाद्या लहानशा तुकड्याLवर समाधान मानू लागला. सत्ताप्राप्तीसाठी दबावगट, केवळ राजकारणासाठी समाजकारण करण्याचा शिरस्ता वाढू लागला. तात्त्विक तडजोडी सुरू झाल्या. जाहीर सभात तत्त्वज्ञान आणि बंद खोल्यात गुपचूप 'अर्थ'पूर्ण व्यवहार सुरू झाले. याला कोणताही एकच घटक जबाबदार आहे, असे नाही. जोपर्यंत घेणारे हात आहेत तोपर्यंत देणारे देत राहतील आणि आपल्या सोयीप्रमाणे त्यांना वापरून घेतील, हीच सध्याची रीत आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवे. सांप्रतच्या काळात सामाजिक स्थिती अत्यंत विदारक आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंद पानसरे, गौरी लंकेश, पत्रकार कलबुर्गी आदी समाजधुरिणांचे मारेकरी मोकाट फिरताहेत. अलीकडेच समाजाला कलंक लावणाऱ्या दिल्ली/ रोहतक, बदलापूर, कोपर्डी सारख्या ज्या घटना घडल्या अशा शेकडो घटना घडतात. केवळ हिमनगाचे टोक लोकांसमोर येते. बलात्काराच्या आरोपाखाली तुरुंगवास पत्करलेल्यांना बाहेर आल्याबरोबर औक्षण करून सत्कार केले जातात. लेण्या - नेसण्यावरून आणि भाषेवरून सामुदायिक अत्याचार होतात. कायदा केवळ सामान्य माणसासाठीच आहे की काय अशी शंका यायला लागते. आरोपींना कायद्याचा धाक वाटत नाही. या सर्व बाबींचा साकल्याने विचार केल्यास शिव - शाहू - फुले - आंबेडकरांच्या पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात पुरोगामी लोकचळवळीची लक्तरे वेशीवर टांगण्याचे काम सुरू असल्याबद्दल वैषम्य वाटण्याशिवाय आपण दुसरे काय करू शकतो, अशी सामान्यजनाची धारणा झाल्यास नवल नाही. विद्रोहीसारखी काही साहित्य संमेलने भरवून काहीजण आपली भूमिका पोटतिडकीने मांडतात, ही आश्वासक बाब म्हणता येईल. मात्र, त्या त्या साहित्य संमेलनात पारित केलेल्या ठरावाचे पुढे काय होते? त्या त्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार कधी होतो काय? स्त्री मुक्ती चळवळ कितीही प्रामाणिकपणे कार्य करीत असली तरीही अनिष्ट परंपरांच्या वाहक स्त्रियाही आहेत, हे कोण अमान्य करेल? म. फुले आणि सावित्रीबाईंनी आपले आयुष्य स्त्रियांच्या उत्थानासाठी खर्ची घातले पण आज अनेक शिकल्या - सवरलेल्या स्त्रिया वडाच्या झाडाला धागेदोरे बांधत सती सावित्रीचे उपवास करतात, हे वास्तव आहे. असे असले तरीही आंबेडकरी चळवळ निष्ठेने पुढे रेटण्याचे काम काही तत्वनिष्ठ मंडळी करते आहे, नाही असे नाही पण ते अल्पमतात येतात. काही सन्माननीय अपवाद वगळल्यास अनेकजण क्षुद्र स्वार्थासाठी प्रतिगाम्यांच्या तंबूत दिसतात. त्यांचीच भाषा बोलतात, याला काय म्हणावे? नेते अनेक गटातटात विभागले गेल्याने त्यांचा म्हणावा तसा प्रभाव पडत नाही. परिणामी त्यांना ना राजकारणात मानमरातब मिळतो, ना समाजकारणात. निषेध नोंदविणे आणि मेणबत्या पेटवून शांतता रॅली काढण्याशिवाय सामान्यजन दुसरे काय करणार? खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करण्याचे काम पैशाचा 'पावर' करीत असेल तर सामान्यांनी कोणाच्या तोंडाकडे पहावे? सद्य स्थितीत विद्यार्थ्यांचे, बेरोजगारांचे, मजुरांचे , कष्टकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर असताना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून नोकरशाही स्वार्थासाठी रसातळाला जात असल्याचे चित्र आहे, आभाळच फाटते आहे तेव्हा ठिगळ कोठे कोठे लावावे? हाही प्रश्नच आहे. त्या साठी संतांचा आणि समाजधुरिणांचा वैचारिक वारसा जतन करून भावी पिढीपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आता नव्या पिढीवर येऊन पडते. आज जरी परिवर्तनवादी चळवळीस पठारावस्था आली असेल तरी लवकरच नवी पिढी नव्या जोमाने चळवळ पुढे घेऊन जाईल, असा आशावाद करायला काय हरकत आहे?

**प्रा. शिवाजी वाठोरे**

(लेखक ख्यातकीर्त कवी, समीक्षक आणि सामाजिक चळवळीचे अभ्यासक आहेत.)

## एक नोव्हेंबर २००५ पूर्वी प्रक्रिया सुरू झालेल्या शिक्षकांना मिळणार जुनी पेन्शन योजनेचा लाभ!

**कन्नड :** शिक्षण सेवक भरती प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २००५-२००६ मध्ये छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषदेअंतर्गत नियुक्त झालेल्या शिक्षण सेवकांना ग्रामविकास विभाग शासन निर्णय एक ऑक्टोबर २०२४ अनुसार 1 नोव्हेंबर 2005 आधीपासूनच भरतीची प्रक्रिया सुरू झालेली असल्याने एकूण 787 पदांवर नियुक्ती झाल्यामुळे या शिक्षण सेवकांना जुनी पेन्शन चा लाभ देण्यात यावा यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून संभाजीनगर सह बीड लातूर परभणी नांदेड जालना धुळे सोलापूर जळगाव बुलढाणा अहिल्यानगर इत्यादी ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शिक्षक बांधव भगिनी यांनी एकजुटीने पुन्हा एकदा आपल्या हक्काची संविधानिक व लोकशाही मार्गाने न्यायिक प्रक्रियेच्या माध्यमातून जुनी पेन्शन मिळवण्याचा दृढ निश्चय संकल्प करून पुन्हा एकदा जुनी पेन्शन लढायची मुहूर्तमेढ स्वामी विवेकानंद गार्डन N १२ टीव्ही सेंटर छत्रपती संभाजी नगर या ऐतिहासिक नगरीत रोवली. वित्त विभागाचा शासन निर्णय २ फेब्रुवारी २०२४ अनुसार व ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय १ ऑक्टोबर २०२४ अन्वये एक नोव्हेंबर २००५ पूर्वी अधिसूचना जाहिरात प्रकाशित झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ मिळत आहे .नुकतेच मुंबई हायकोर्टाच्या निकालातील रिट पिटीशन क्रमांक १२४०/२०२६ अनुसार न्यायमूर्ती रवींद्र घुगे व अभय मंत्री यांच्या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी न्याय मागितलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांची भरती प्रक्रिया एक नोव्हेंबर २००५ पूर्वीची असल्यास त्याची खात्री करून जुनी पेन्शन योजनेचा लाभ देण्याचे निर्देश दिले आहे. जुनी पेन्शन संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक श्री उद्धव बोचरे यांनी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथून त्याचप्रमाणे शिक्षण आयुक्त कार्यालय व शिक्षण संचालक कार्यालय पुणे व ग्रामविकास विभाग ,शालेय शिक्षण विभाग व वित्त विभाग मंत्रालय मुंबई या ठिकाणी गेल्या वर्षभरापासून सातत्याने पाठपुरावा करून जुनी पेन्शन योजने संदर्भात ठोस पाठपुरावा करून फेब्रुवारी २००६ मधील जाहिरातीनुसार नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी लावून धरली आहे. यासंदर्भात आतापर्यंत नऊ सुनावण्या त्यांनी पूर्ण केलेल्या असून उपलब्ध झालेले दस्तऐवज संचिका, टिप्पण्या व आता न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार जुनी पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेवटची व आरपारची लढाई लढण्याचा दृढ संकल्प त्यांच्यासह हजारो शिलेदारांनी व्यक्त केलेला आहे.

लढेंगे ! जितेंगे !
एकच मिशन !जुनी पेन्शन !

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची कार्यकारिणी जाहीर





**सिल्लोड :** येथील इंद्रराज महाविद्यालयात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची बैठक घेऊन सिल्लोड शाखा अध्यक्षपदी ॲड. संतोष झाल्टे यांची तर कार्याध्यक्षपदी डॉ. प्रकाश बिऱ्हाडे यांची फेरनिवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे होते. बैठकीत निवडण्यात आलेली उर्वरित कार्यकारिणी अशी - उपाध्यक्ष- प्रा. डॉ. व्यंकटेश लांब, जगदीश बेदवे, प्रधान सचिव - एन. आर. फाळके, सचिन दांडगे, सीताराम काळे, बुवाबाजी विरोधी संघर्ष कार्यवाह - हरिदास वाघ, सहकार्यवाह - मुसाखान पठाण, विविध उपक्रम कार्यवाह- प्रा. डॉ. अनिरुद्ध मोरे, सहकार्यवाह - अनिल साबळे, वैज्ञानिक जाणिवा कार्यवाह - प्रा. डॉ. जगदीश सावदेकर, सहकार्यवाह - डॉ. सचिन साबळे, डॉ. दत्तात्रेय भवर महिला कार्यवाह - प्राचार्य अर्चना अहिरे, सहकार्यवाह - सरला कामे, युवा कार्यवाह - गजानन इंगळे, सहकार्यवाह - नितीन निकम सांस्कृतिक कार्यक्रम कार्यवाह - रुपेश ठाकूर, सहकार्यवाह - किसनराव शिंदे बैठकीचे सूत्रसंचालन एन. आर. फाळके यांनी केले. प्रा. डॉ. अनिरुद्ध मोरे यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ मार्च २०२६


## जय हो भारत

थरथरले ना हात मावळे
शरण कधी ना गेले
मनगटातले बळ घेऊनी
दोन्ही बाहु लढले.

आले वीर मरण तरीही
ना हरले ना झुकला माथा
त्याच वीरांच्या मायभूवरी
लिहिल्या पवित्र गाथा.

लढल्या खिंडी लढले किल्ले
प्राणपणाने इथे झगडले
अमरवीरांच्या रक्ताने ते
पावन झाले पावन झाले.

भूमी रणवीराचीं कवणे लिहितो
गाऊ भारतभुचे गाण
जय जय भारत जय हो भारत
गाऊ रे गुणगान..
गाऊ रे गुणगान......

**भूमिपुत्र वाघ**
उमरगा धाराशिव महाराष्ट्र.
९१७२९७२४८२

## लेक

लेक काळजाचं सोनं
लेक आयुष्याचं देणं

लेक हिरवं शिवार
लेक गळ्यातला हार
लेक उन्हात सावली
लेक दुसरी माऊली
लेक प्रसन्न सकाळ
लेक कवितेची ओळ

लेक चिमणी ती गोड
लेक आनंदाच झाड

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

## उन्हाळा

आला उन्हाळा उन्हाळा
मुलं झाडाखाली गोळा
झाड देते सावली
सोसूनी उन्हाच्या कळा

आला उन्हाळा उन्हाळा
नाही आता शाळा
ना गुरुजींची शिक्षा
ना पाटी, पुस्तक, फळा

आला उन्हाळा उन्हाळा
आईस्क्रीमवर सदा डोळा
येता जाता कैऱ्या खाऊनी
बसेल मग गळा

आला उन्हाळा उन्हाळा
मामाच्या गावाला पळा
चिरेबंदी वाड्यात
लपंडाव खेळा

आला उन्हाळा उन्हाळा
गोष्टींची पुस्तके करा गोळा
अंगत पंगत खेळूनी
पार पाडा सोहळा



**- रविंद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शेतकरी मेळावा व माती परीक्षण मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न




**उमरगा :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात भारत शिक्षण संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर चे अधिसभा सदस्य मा. श्री. अश्लेष भैय्या शिवाजीराव मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयक्यूएसी व भूगोल विभागातील माती परीक्षण केंद्राच्या वतीने शेतकरी मेळावा व मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक मोईन सय्यद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. याप्रसंगी अश्लेष भैय्या मोरे मित्र मंडळाचे अध्यक्ष आणि नगरसेवक श्री विशाल काणेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील माती परीक्षण केंद्राच्या वतीने माननीय अश्लेष भैय्या मोरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील मातीचे परीक्षण करून जमिनीची आरोग्य पत्रिका तयार करण्यात आली. उमरगा परिसरातील ४० शेतकऱ्यांच्या जमिनीची आरोग्य पत्रिका तयार करून शेतकऱ्यांना त्याचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री मोईन सय्यद यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व, मातीतील अन्नद्रव्यांचे संतुलन, तसेच माती परीक्षणाच्या आधारे योग्य खत व्यवस्थापन कसे करावे याबरोबरच सेंद्रिय शेती वर्तमान व भविष्य याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. माती परीक्षण केल्यास पिकांचे उत्पादन वाढण्यास मदत होते व जमिनीची सुपीकता टिकवून ठेवता येते, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक उत्पादक बनवावी, याबरोबरच येणाऱ्या काळात उद्भवणाऱ्या समस्या अडचणी सोडवण्यासाठी आमचे महाविद्यालय सदैव तत्पर राहील त्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी आमच्याशी संवाद साधावा असे आवाहन केले. या मेळाव्यास उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, आयक्यूएसी समन्वयक डॉ. विनोद देवरकर, प्रभारी प्राध्यापक डॉ. अशोक पदमपल्ले, उपप्राचार्य प्रा. गुंडाजी बापू मोरे तसेच पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, डॉ. सतीश गावित, डॉ. रंजना चोचंडे डॉ. अतुल बिराजदार, डॉ. बालिका गायकवाड प्रा.अंकीता जाधव आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. धनराज इटले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सूर्यकांत राठोड यांनी केले तर आभार माती परीक्षण केंद्र समन्वयक डॉ. अर्जुन कटके यांनी मानले.

## भगवान विद्यालय आडगाव बुद्रुक येथे जागतिक महिला दिन साजरा




**आडगाव बु. :** येथील भगवान विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक महिला दिन मोठ्या थाटामाटात व उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय देसले हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून ज्योती ठाकरे छाया कणसे संगीता पाटील उपस्थित होते जागतिक महिला दिनाचे अवचित्य साधून विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनीनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले माँ. जिजाऊ झाशीची राणी लक्ष्मीबाई इत्यादी च्या वेशभूषा परिधान करून उपस्थित होत्या याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. बाबासाहेब बडधे यांनी केले तसेच प्रमुख अतिथी म्हणून ज्योती ठाकरे मॅडम छाया कणसे उपस्थित होत्या यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले यासोबतच कुमारी ज्ञानेश्वरी साळुंके ,श्रुती दसपुते , किरण शेजूळ, प्रिती हाके इत्यादी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच कृष्णा सूर्यवंशी रोहन रसाळ या विद्यार्थ्यांनी जागतिक महिला दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय देसले यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री देविदास शिरसाठ यांनी केले या कार्यक्रमानिमित्त गावातील बहुसंख्य नागरिक माजी विद्यार्थी तसेच सहशिक्षक राजेंद्र पगारे ऋषिकेश चाथे सुनील बनसोडे इत्यादींची उपस्थिती होती.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ मार्च २०२६


# एकल महिलांचे जीवन - एक अखंड संघर्ष



तीचे निधन, घटस्फोट, पतीने सोडून जाणे किंवा परिस्थितीमुळे एकट्याने आयुष्य जगावे लागणे अशा कारणांमुळे अनेक महिला एकल जीवन जगतात. अशा महिलांना समाजात अनेक स्तरांवर संघर्ष करावा लागतो.त्यांच्या प्रमुख समस्या : एकटेपणा आणि मानसिक ताणपतीच्या निधनानंतर किंवा विभक्त झाल्यानंतर अनेक महिलांना मानसिक धक्का बसतो. समाजातील उपेक्षा आणि एकटेपणा यामुळे त्यांचे मानसिक आरोग्यही बिघडते.आर्थिक असुरक्षितता-अनेक महिलांना नियमित उत्पन्नाचे साधन नसते. त्यामुळे घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च भागवणे कठीण जाते.सामाजिक दडपणग्रामीण भागात विधवा किंवा परित्यक्ता महिलांकडे आजही सहानुभूतीपेक्षा वेगळ्या नजरेने पाहिले जाते.कायदेशीर व प्रशासनिक अडचणीशासकीय योजना मिळवताना कागदपत्रे, प्रमाणपत्रे आणि प्रक्रियेतील गुंतागुंत मोठा अडथळा ठरते.एकल महिलांच्या मुलांचे शैक्षणिक प्रश्नएकल महिलांच्या मुलांना देखील अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.प्रमुख समस्या : शिक्षणासाठी लागणारा आर्थिक खर्चशैक्षणिक साहित्य व फी भरण्याची अडचण मानसिक आधाराचा अभाव शिक्षण अर्धवट सोडण्याचा धोकाअनेक वेळा आर्थिक परिस्थितीमुळे हुशार विद्यार्थीही शिक्षणापासून वंचित राहतात.सरकारकडून उपलब्ध योजनामहिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र आणि राज्य सरकार विविध योजना राबवत आहेत.१. संजय गांधी निराधार अनुदान योजनाया योजनेअंतर्गत विधवा, परित्यक्ता आणि निराधार महिलांना दरमहा आर्थिक मदत दिली जाते.२. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजनागरीब विधवा महिलांना आर्थिक आधार देण्यासाठी ही योजना सुरू आहे.३. महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM) योजनामहिलांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण, कर्ज व आर्थिक मदत दिली जाते.४. स्वयं सहाय्यता गट (Self Help Group)महिलांनी एकत्र येऊन बचत गट स्थापन करून लघुउद्योग सुरू करण्यासाठी शासन मदत करते.५. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनागर्भवती महिलांना आर्थिक सहाय्य दिले जाते.मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व योजनाएकल महिलांच्या मुलांसाठी विविध शैक्षणिक योजना उपलब्ध आहेत.१. RTE (Right to Education) प्रवेशखाजगी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना २५% आरक्षण.२. राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना (NSP)गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.३. राज्य शासनाच्या शिष्यवृत्तीमहाराष्ट्र शासनाकडून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.४. खाजगी सामाजिक संस्थांकडून विविध स्कॉलरशिपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आर्थिक मदत. 5. ज्ञानेश्वर सेवाभावी संस्थेच्या वंदेमातरम आयटीआय कॉलेज, अंबाजोगाई मध्ये एकल महिलांना किंवा त्यांच्या पाल्यांना फीस मध्ये 50% सूट दिली जाते 6. ज्ञानेश्वर सेवाभावी संस्थेच्या एकल महिला व अनाथ बालक पुनर्वसन प्रकल्पच्या अंतर्गत अनेक एकल महिलांना तसेच अनाथ बालकांना विविध योजनेच्या माध्यमातून अर्थासाहाय्य केले जाते खाजगी व सामाजिक संस्थांची मदतज्ञानेश्वर सेवाभावी संस्थे प्रमाणे इतर अनेक स्वयंसेवी संस्था आणि ट्रस्ट एकल महिलांना मदत करतात.वंदेमातरम आयटीआय कॉलेज च्या माध्यमातून अतिशय कमी फीस मधून कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत केली जाते मुलांच्या शिक्षणासाठी स्कॉलरशिप मिळवून दिली जातेकायदेशीर सल्ला व मानसिक समुपदेशन केले जातेसमाजाची जबाबदारीएकल महिलांना केवळ सहानुभूतीची नाही तर समान संधी आणि सन्मानाची गरज आहे. समाजाने त्यांना आधार देणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणाला पाठबळ देणे अत्यंत आवश्यक आहे.निष्कर्षआंतरराष्ट्रीय महिला दिन हा फक्त उत्सव नसून समाजातील दुर्लक्षित महिलांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा दिवस आहे. विधवा, परित्यक्ता आणि एकल महिलांच्या आयुष्यातील संघर्ष ओळखून त्यांना आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक आधार देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.महिलांना सक्षम केल्याशिवाय समाजाचा विकास शक्य नाही. त्यामुळे प्रत्येक महिला स्वावलंबी, सुरक्षित आणि सन्मानाने जगेल असा समाज निर्माण करणे हीच खरी महिला दिनाची प्रेरणा आहे.


**भगवंत पाळवदे**
**एकल महिला व अनाथ बालक**
**पुनर्वसन प्रकल्प, बीड**


# राज्यातील ३७ महिलांना 'कर्तृत्ववान महिला पुरस्कार' जाहीर

शिक्षक ध्येय
विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षकांचे राज्यस्तरीय व्यासपीठ असलेले शिक्षक ध्येय, मातृसेवा फाउंडेशन आणि यशिता गार्डन नर्सरी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान महिला पुरस्कार २०२६' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आज जागतिक महिला दिनानिमित्त या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. राज्यातील महिलांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती इतरांना व्हावी, प्रोत्साहनासह त्यांच्यातील कर्तृत्व वाढीस लावणे याच हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील ३७ महिलांना ‘कर्तृत्ववान महिला’ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार प्राप्त महिलांमध्ये : डॉ. नाझिया माजिद सय्यद (नाशिक); वनश्री साहेबराव महालकर (यवतमाळ); ताई सुरेश लांडे (धाराशीव); सौ. रोहिणी अमोल पराडकर (मुंबई); वंदना सालवटकर (वर्धा); संगीता तुळशीराम पवार (मुंबई); सुरेखा तात्याबा चौरे (सोलापूर); सरला शामराव कामे (छत्रपती संभाजीनगर); दुर्गा योगेश गाडेकर (बुलढाणा); जया अरुण बळी (बुलढाणा); निर्मला दिलीपराव नंदुरकर (वर्धा); विद्या कृष्णराव वालोकर (वर्धा); अस्मिता विठ्ठलराव क्षीरसागर (बुलढाणा); उमा भाऊराव पाटील (छत्रपती संभाजीनगर); कविता प्रकाश खैरनार (नंदुरबार); अश्विनी विशाल गिरी (नंदुरबार); मंगला गजानन डगवार (वर्धा); वर्षा सुरेशराव पवार (नंदुरबार); प्रियदर्शिनी नामदेवराव झोड (अमरावती); सौ. निर्मला रमेश मचाले (पुणे); पूजा प्रभाकर पवार (नाशिक); यशोधरा महेंद्र सोनेवाने (गोंदिया); सागीरा नियाजुद्दिन सिद्दिकी (वर्धा); सीमा गिताराम मेहत्रे (लातूर); सौ. वैशाली तुषार लांजेवार (वर्धा); भारती युवराज मराठे (नंदुरबार); स्वाती अरविंद वानखडे (अमरावती); कांचन सुनिल जाधव (रत्नागिरी); अनुश्री अरविंद कोपरे (वर्धा); मीना विजय सोनकुसले (अमरावती); रितू गंगाराम पुजारी (यवतमाळ); वसुधा वैभव नाईक (पुणे); . डॉ. वैशाली शांताराम शिंदे (नंदुरबार); मेधा निलेश चिटगोपेकर (नागपुर); पोलीस उपनिरीक्षक सोनी सदाशिव शेट्टी (ठाणे); डॉ. सुमन नवलकर (मुंबई); वंदना विनोदकुमार नरळे (रायगड) यांचा समावेश आहे. पुरस्कार विजेत्यांचे मातृसेवा फाउंडेशनच्या संध्या सावंत, यशिता गार्डन नर्सरीचे अथर्व यशवंत गडवार, शिक्षक ध्येयचे मधुकर घायदार; प्रभाकर कोळसे, कविता चौधरी, सुरेखा उजगरे, डॉ. फकिरा राजगुरू, डी. जी. पाटील, राजेश चायंदे, प्रेमजीत गतीगंते, भाग्यश्री पवार, मेघा पाटील, विलास मेश्राम, श्रद्धा पवार, अशरफ आंजलेकर, अर्चना भरकाडे, महेंद्र सोनेवाने आदींनी अभिनंदन केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



जाहिरात दर


| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ मार्च २०२६


# एका निस्सीम कृतज्ञ भक्तीची चरित्रकथा : देवमाणूस




कवीच्या सृजन भावनेला आपल्या बालपणीच्या संघर्षाची स्मृती जेव्हा बैचेन करते.आपल्यावर कृपाळू छत्र धरणारी कृपा करणारी त्यासाठीची कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे.आपल्यावर अंनत उपकार ठेवून काही ईश्वरी अंशाचा ठसा उमटलेला असतो.अंतरगी मन त्याचे ग्वाही देतं असते.मीशिकलो ज्यांनी माझ्यावर उपकार केले.ती कृतज्ञ मानाची श्रध्देय भावना असते.ती या चरित्र लेखनात आली आहे.शिवाच्या जगण्यावर पडतो.शिक्षण,वाचन व जिद्द म्हणजे शिवाजी.तत्कालीन दुष्काळाची परिस्थिती उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत.त्याकाळाचं शिक्षण फक्त गावकुसा पर्यंत.पुढे फक्त पैशावालाचं शिकतं होता.भावकी गावकी टावकी म्हणून कुणीच मदत करतं नव्हतं.शिवाजी कायंदे यांच्या शिक्षणप्रेरणेचे अधिष्ठान म्हणून गाव शिवार शेजारचा देवमाणूस भेटतो.कारण या माणसाला माणसालं दैवत उडवून आणायचं होतं.जो शिक्षणाचा दर्जा ठेवून संघर्ष करतो.तोच कार्यकर्तुत्वान होतो.देवमाणूस लेखकावर अनंत उपकार करून जातो.ही कृतज्ञता म्हणजे 'देवमाणूस' हे नितळ श्रध्देय भावनेतून चरित्र लेखन आले आहे.माणूस म्हणून जन्माला आल्यावर काय देऊन गेला.आपल्या मनावर संस्काराचे कोरीव शिल्प देऊन जाणे आईच्या उदरातून तो देह घेऊन आला.या देहाचं देहू करण्याचं काम तुकारामांनी केलं.कवी, कथाकार शिवाजी राघुजी कायंदे यांनी 'देवमाणूस' या शिर्षकाचे चरित्र लेखन केले आहे.आपल्या गावाच्या शेजारी राजेगाव ता.सिंदखेड जि.बुलढाणा येथील एक सर्वहरा हरिजन सेवक कुटुंबात जन्मलेले भिकाजी सरकटे भिकाजी बाबा याचे लक्षवेधी चरित्र मांडले आहे.काळ अत्यंत खडतर भिकाजी सरकटे पोलिस भरती होऊन त्यांनी नोकरी केली नाही.कारण फक्त आई बाबांची सेवा करता यावी.त्यांना सुखाचे दोन घास खाता यावे.ही मनाची अदम्य् इच्छा.गावशिवार आणि सामाजिक अराजक्ता जातीपातीच्या फाटा पाटाच्या चौकटी मोडून धार्मिक कार्य करणारे भिकाजी बाबा सरकटे.नाकपुडीच्या हवेवर दोन बारीतून अगम्य स्वर काढणारे,कमी काळातचं लौकिक करून दाखवल्याने पुढे बॅन्डबाज्या पथक काढले.टेलरकीचे काम केले.गायरान पडीत जमीनी सरकारी दरबारी संघर्ष करुन सर्वहरा मागास प्रवर्गांना मिळवून देण्याचं काम केलं.गोरगरीबांच्या मुलांना शिक्षणासाठीमदत केली.त्यात चरित्रलेखक शिवाजी कायंदे साहेब यांच्या तळमनाने ठाव घेऊन आपण आपल्या देवमाणसाला वाचकांच्या नजरेत उभे केले आहे.गुंजगाव त्या गावांतील प्रगतीचा आलेख उंचावत ठेवण्याचं काम भिकाजी बाबा सरकटे यांनी केले आहे.पुढे काळाच्या ओघात त्यांचे देहावसान झाले.पण अनेकांच्या हृदयात भिकाजी बाबा सरकटे कायमचं आहेत नव्या पिढीला आपल्या गावा शिवा लगतचा एक स्वतंत्र अस्तित्व धोक्यात घालून मदतीला धावून जाणारा एक साक्षात देवमाणूस या चरित्रात मांडला आहे.आज त्यांची मुलं नातू पंनतू उच्च विभूषित आहे.घरदार गाव शिवार,शेजार पाजार, सारं काळाच्या पडद्याआड गेलं तरी स्मृती सेवारती कायमचं मनांत राहतात.म्हणूनच पुस्तकं घडवतात मस्तक' आणि तेचं देतं विचारांची दस्तकं.ही शिदोरी लेखक शिवाजी कायंदे साहेबांनी जाणिवपूर्वक आपल्या सन्मित्र सृजनशील स्नेहाळू कृतज्ञता पुर्वक अभिव्यक्त केली आहे.आजचा कृतघ्नतेचा काळ आला आहे.भंयकरांचे अरिष्ट आपल्या दारात आहे.हळहळ, कळकळ वाटावी अशी मानसिकता चं राहिली नाही.माणसा विषयीची कृतज्ञता व्यक्त करण्याचा काळ आता राहिला नाही.यात स्वार्थ साधक नावाचे नवे साधू आले आहे.या चरित्रलेखनात अतिशय आशय संपन्न रेखाटणे केली आहेत जसे तथागताचे पिंपळपान त्या पानावर अंगठा आणि लेखणी,एक तोडलेले खोड त्या खोडातून उगवलेले हात.हातात चिपळ्या "चंदणाचे हात पाय ही चंदन" ही तुकोबांची उक्ती.तर अर्पण पत्रिका "उध्दारली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे" डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन स्मृतीस.'मला काही सांगायचं' हे मनोज्ञ मनोगत हा या चरित्रकथेचा आत्मा आहे.या चरित्रात कालानुक्रम १) भिकाजी बाबांचा जन्म आणि आर्थिक परिस्थिती २) बालपण शिक्षण ३) गरीबी परिस्थितीतून वाटचाल ४) छंद व साधना ५) बासरीवादनाच्या छंदाचे फायदे ६) विवाह व वैवाहिक जीवन ७)शिवणी पिसे येथील गावकऱ्यांचा रोष व उपद्रव ८) भिकाजी बाबांच्या आई-वडीलांचे निधन९) भिकाजी बाबांनी भूमिहिनांना भूमीपुत्र केले१०) भिकाजी बाबांच्या गुंजापूरीशिवारी स्थायिक होण्याचा निर्णय ११) भिकाजी बाबांचे सद्गुरू स्वामी विश्वासानंद महाराज १२) भिकाजी बाबांवर चालून आलेले दोन जीवघेणी संकटे १३) श्रध्दा, विश्वास व भक्तीभाव १४) भिकाजी बाबांची भीष्मप्रतिज्ञेची पुर्तता१५) भिकाजी बाबांची ईश्वरभक्तीचीआवड १६) भिकाजी बाबांचे परोपकारार्थ कार्य १७) पत्नी सौ.पार्वताबाई यांचे निधन १८) भिकाजी बाबांचे निर्वाण१९) भिकाजी बाबांच्या देहाचे अंतिम संस्कार, या क्रमाने अतिशय उत्तम चरित्र लेखन आले आहे.ख्यातनामकवयित्री डॉ संजीवनी तडेगावकर काव्ययोगिनी यांची पाठराखण त्या लिहितात " 'देवमाणूस'या चरित्रातून वाचकांच्या डोळ्यांसमोर जिवंत चित्र उभं करण्याचं सामर्थ्य कायंदे यांच्या लेखणीत आहे.हे चरित्र लिहून एक प्रकारे भिकाजी बाबा सरकटे यांच्या कार्याची अध्यात्मिक नोंद कायंदे यांनी घेतली आहे.त्याबद्दल त्याचे अभिनंदन व शुभेच्छा.आशय संपन्न रेखाटणे राजू बाविस्कर व माणिक बनसोडे यांचे आहेत.आशघन प्रकाशनची निर्मिती अतिशय देखणी झाली आहे.यातील फोटोग्राफ व मुखपृष्ठ आशयघन झाले आहे.कवी, कथाकार चरित्रकार शिवाजी कायंदे यांचे मनस्वी अभिनंदन व शुभेच्छा.



**पुस्तक : देवमाणूस :-चरित्रकथा**
**लेखक : शिवाजी राघोजी कायंदे, जालना**
**साहित्य प्रकार:-चरित्रकथा**
**प्रकाशक : डॉ संजीवनी तडेगावकर, जालना**
**प्रकाशन : आशयघन प्रकाशन, जालना**
**मुखपृष्ठ:-फोटोग्राफ**
**रेखाटने : राजू बाविस्कर, माणिक बनसोडे**
**प्रथमावृती:-२२फेब्रुवारी २०२६**
**किमत:-२४०रूपये**
**पुस्तक परिचय : डॉ प्रभाकर शेळके,जालना**

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर



**दौलताबाद (जावेद अहमद) :** शेतकरी, विद्यार्थी, पालक तसेच अपंगांना तहसीलदार व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र वाटप महसूल मंत्री बावनकुळे यांच्या संकल्पनेतुन जिल्हा अधिकारी दिलीप स्वामी व उपविभागीय अधिकारी डॉ व्यंकट राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर तहसीलदार उमेश पाटील यांच्या उपस्थितीत शनिवारी, ७ मार्च २०२६ रोजी माळीवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान ची तालुक्यातील पहिली सुरुवात करण्यात आली भावसींग पुरा मंडळ चे मंडळ अधिकारी गणेश सोनवणे यांनी कार्यक्रम आयोजित केलेया कार्यक्रमाचे अध्यक्ष दौलताबाद जिल्हा परिषद सदस्य लंकाबाई रानुबा जाधव , प्रमुख पाहुणे तहसीलदार उमेश पाटील,नगरसेवक गणेश लोखंडे, सरपंच ज्योती नंदकिशोर मुळे,उपसरपंच मनेश गाजरे,अब्दीमंडी सरपंच साबीर पठाण,केसापुरी उपसरपंच ज्ञानेश्वर पवार ,देविदास जरारे,उपनिरीक्षक बापू डोंबाले,संतोष लोळगे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आले आहे. नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा आणि दाखले मिळावेत, हा या शिबिराचा मुख्य उद्देश असल्याची माहिती गणेश सोनवणे यांनी सांगितले शिबिरात प्रमुख दाखले जन्म नोंद दाखला, मृत्यू नोंद दाखला,विवाह नोंद दाखला, निराधार असल्याचा दाखला, नमुना ८ चा उतारा (मालमत्ता नोंद), बेबाकी प्रमाणपत्र (ना हरकत दाखला),दारिद्र रेषेखालील (BPL) असल्याचा दाखला, विविध घरकुल योजनांची माहिती व लाभ,विकसित भारत रोजगार, आजीविका हमी आणि इतर केंद्र/राज्य सरकारी योजनाची माहिती व प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेयावेळी मंडळ अधिकारी अभिलाषा म्हस्के, दौलताबाद महसूल अधिकारी सूरज गिरी,प्रशांत वणकर,राजेंद्र आठवले,साईनाथ बोन्द्रे,राजेंद्र सुलाने,रोहित पवार,ज्ञानेश्वर श्रीसागर स्वप्नील शेळके,ग्रामपंचायत अधिकारी पवार, सुरडकर, ग्रामपंचायत सदस्य कडू कीर्तिकर, धमपाल गायकवाड, प्रवीण बर्डे व शेख बने,सुधाकर हेकडे,सहायक कृषी अधिकारी रंगनाथ पिसाळ,डॉ मनीष फुलारे, पर्यटन सहायक डॉ शिवाजी गायकवाड, रानुबा जाधव, सुधाकर हेकडे, बाबासाहेब मुळे, लक्ष्मण बनकर,दिलीप जाधव, मिलिंद साठे, प्रमोद साठे, पंचक्रोशीतील दौलताबाद, अब्दीमंडी, माळीवाडा, पडेगाव, मिटमिटा,भावसींग पुरा, पदमपुरा येथील शेतकरी, विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक, अंगणवाडी सेविका, प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी, आशाताई ,आदी महिला उपस्थित होते

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ मार्च २०२६


## किमया दौत शाईचे

दौत बुडवून शाईत ,
वहीवर लिहितो अक्षर.
उमटलेले शब्द कायम,
होणार नाहीत नश्वर.

शाई पिऊन दौत चालते,
पांढऱ्या वहीवर लिहितांना.
शब्दा शब्दांचा नाद घुमतो,
सदा अक्षर अक्षर वाचतांना.

किमया आहे दौत शाईचे,
अक्षरांना आकार देतांना.
दौत चालता अक्षर उमटते,
शोभून दिसते वळण घेतांना.

दौत वही शाईची जोडी,
शोभून दिसते खूप छान.
सदा सर्वदा साथ देऊन,
एकमेकांना देतात मान.

वही,शाई, दौत अन् टाक,
चित्रात शोभून दिसतात खास.
दौत चालता अक्षरांचा पडतो,
वहीवर खंडीभर शब्दांचा रास.

काळ बदलता लोप पावले,
आता फक्त चित्रात राहिले.
ज्यांनी ज्यांनी लिहिले दौताने,
तेच चित्र न्याहाळून पाहिले.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# सावित्रीची लेक : श्रीमती मीरा बनकर



**शि**क्षणाच्या क्षेत्रात अत्यंत उत्कृष्ट कार्य करणारी अनेक व्यक्तिमत्त्वे आपल्या आसपास असतात; पण त्यांपैकी बरीचशी माणसे प्रसिद्धीच्या झोतापासून दूरच राहतात. आजच्या काळात मात्र प्रसिद्धीची हाव दिवसेंदिवस वाढताना दिसते—स्वतःहून आदर्श शिक्षक, समाजभूषण अशा पुरस्कारांसाठी अर्ज करणे, शिफारशी लावणे, पैसे खर्च करणे, सोशल मीडियातून स्वतःची जाहिरात करणे… अशा प्रवृत्ती सर्वत्र दिसतात. या गोंगाटाच्या काळातही काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की जी कोणत्याही गाजावाजाविना, शांतपणे आणि निष्ठेने आपल्या कामावर लक्ष केंद्रित करून समाजात खरा बदल घडवत असतात. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका श्रीमती मीरा बनकर.

जिल्हा परिषद शाळा म्हटली की सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलामुलींचा आधारवड अशी तिची ओळख असते. अशा शाळांमधूनच ग्रामीण समाजातील असंख्य मुलांच्या आयुष्याला दिशा मिळते. परंतु आज काही धोरणांमुळे अशा शाळा कशा बंद पडतील, याच दिशेने परिस्थिती जात असल्याची खंत व्यक्त होते. तरीही या प्रतिकूल वातावरणातही महाराष्ट्रातील अनेक शिक्षक-शिक्षिका तन-मन-धनाने शिक्षणाची ज्योत तेवत ठेवत आहेत. त्या तेजस्वी परंपरेतील एक समर्पित नाव म्हणजे श्रीमती मीरा बनकर.

सातारा जिल्ह्यातून बदली होऊन त्या संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील दुर्गम, डोंगरी आणि सामाजिकदृष्ट्या मागास भागात कार्यरत झाल्या. गावाच्या परिसरात गौताळा अभयारण्य असल्याने आजूबाजूला घनदाट जंगल, डोंगररांगा आणि विरळ वस्ती. नीट रस्ते नाहीत, मोबाईल टॉवरची रेंज नाही, गावात एस.टी.ची सोय नाही. फाट्यावर उतरून पायी चालतच गावात जावे लागते. अशा परिस्थितीत काम करणे म्हणजे खऱ्या अर्थाने जिद्दीची आणि ध्येयवेडी वृत्तीची कसोटीच होती.

गावातील अनेक विद्यार्थ्यांची मातृभाषा मराठीपेक्षा वेगळी असल्यामुळे त्यांना मराठी समजत नव्हते. त्यामुळे शिकवलेले धडे त्यांच्या मनापर्यंत पोहोचत नव्हते. परंतु मॅडमनी या अडचणीला समस्या न मानता आव्हान म्हणून स्वीकारले. त्यांनी विद्यार्थ्यांची मातृभाषा शिकून घेतली, त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला आणि शिक्षणाची गोडी निर्माण केली. त्या माध्यमातून मराठी, इंग्रजी आणि इतर विषय शिकवण्याची प्रक्रिया सहज आणि परिणामकारक बनली.

या गावात अज्ञान, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि अस्वच्छता मोठ्या प्रमाणात होती. मुलांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगणे, त्यांची नखे स्वतः कापून देणे, स्वच्छतेची सवय लावणे—ही कामे त्या ममतेने करत. सहावी-सातवीतील काही मुलामुलींमध्ये व्यसनाची लक्षणे दिसू लागल्यावर त्यांनी त्यामागील कारणांचा शोध घेतला. घरातील वातावरणच व्यसनाधीन असल्याने त्याचा परिणाम मुलांवर होत असल्याचे त्यांना जाणवले. काही घरांत दारू तयार केली जात असल्याने मुलेही त्या सवयींकडे वळत होती. मॅडमनी संयमाने प्रबोधन केले, व्यसनाचे दुष्परिणाम समजावले आणि त्या सवयींपासून मुलांना दूर नेण्याचा प्रयत्न केला.

बालविवाह रोखण्यासाठीही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना पटवून दिले. अनेक विद्यार्थ्यांकडे वह्या, दप्तर, पेन-पेन्सिल खरेदी करण्याइतकेही पैसे नसत. अशा विद्यार्थ्यांना त्या स्वतःच्या खर्चातून साहित्य देत. बालसाहित्य तसेच महापुरुष आणि महानायिकांची चरित्रे वाचायला देऊन त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण केली. विद्यार्थ्यांच्या वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट देणे तसेच गावात किंवा इतर कार्यक्रमांत पुस्तके भेट देण्याची सुंदर परंपराही त्यांनी सुरू केली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढावी आणि समाजात ज्ञानाची परंपरा रुजावी यासाठी त्यांनी एक अभिनव उपक्रम सुरू केला. “चला पुस्तकाचे वान देऊ सारे, ज्ञानवंत होऊ सारे.”

मकरसंक्रांतीच्या निमित्ताने महिलांमध्ये वान देण्याची परंपरा आहे. या वानामध्ये बहुतेक वेळा मेंदीचे कोन, लिपस्टिक बाम, नेलपॉलिश किंवा प्लॅस्टिकच्या वस्तू दिल्या जातात. परंतु या वस्तूंचा उपयोग फारसा होत नाही. याऐवजी समतावादी महापुरुष आणि महानायिकांच्या विचारांवरील पुस्तके वान म्हणून देण्याचा संदेश त्यांनी समाजात दिला. ज्ञानाचे वान देणे म्हणजे समाजात वाचनसंस्कृती रुजवण्याची एक छोटी पण अर्थपूर्ण क्रांती आहे.

अशा प्रकारे पुस्तकांचे वान देणे म्हणजे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांना खऱ्या अर्थाने अभिवादन ठरेल, असा त्यांचा विश्वास आहे. या उपक्रमातून कमी किमतीत दर्जेदार पुस्तके लोकांपर्यंत पोहोचवून वाचन चळवळीला चालना देण्याचेही त्यांनी कार्य केले. याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची आणि प्रेरणेची जाणीव निर्माण व्हावी म्हणून क्रांतिकारक, महापुरुष आणि महानायिकांच्या जयंती-पुण्यतिथी तसेच शासनाच्या परिपत्रकांद्वारे सुचविलेले विविध उपक्रम त्या नाविन्यपूर्ण पद्धतीने राबवतात. मुलांना गाणी-कविता म्हणायला लावणे, भाषणे करायला प्रोत्साहन देणे, सांस्कृतिक कार्यक्रमांत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे—यासाठी त्या मनापासून मेहनत घेतात. कार्यक्रमांसाठी लागणारे पोशाखसुद्धा अनेकदा स्वतःच्या खर्चातून उपलब्ध करून देतात. या सर्व प्रयत्नांतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार मिळत गेला. आज त्यांच्या हाताखाली शिकलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत प्रगती करत आहेत. काहीजण चांगल्या पदांवर पोहोचले आहेत. हा बदल केवळ शिक्षणाचा नाही, तर संपूर्ण गावाच्या सामाजिक जाणिवेचा आहे.

हे सर्व कार्य करत असताना त्यांना अनेक अडथळे, त्रास आणि अडचणींचा सामना करावा लागला. तरीही त्या सावित्रीच्या लेकीप्रमाणे खंबीर राहिल्या—न डगमगता, न थकता पुढे चालत राहिल्या. शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडवण्याची त्यांची वाटचाल आजही अखंड सुरू आहे. अलीकडेच त्यांची बदली पैठण तालुक्यातील एका गावात झाली आहे. परंतु ठिकाण बदलले तरी त्यांची ध्येयवेडी वृत्ती बदललेली नाही. तिथेही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समाजात ज्ञानाचा प्रकाश पसरवण्यासाठी त्यांचे कार्य तितक्याच समर्पणाने सुरू आहे. समर्पण, संवेदनशीलता आणि शिक्षणाबद्दलची अखंड निष्ठा यामुळेच त्या खऱ्या अर्थाने “सावित्रीची लेक” ठरतात. महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या या कार्याला मनःपूर्वक सलाम आणि त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ मार्च २०२६


# भारतीय संविधानामूळेच आपला सर्वांगीण विकास, संविधान हे जगण्याला बळ देते. आपला आत्मविश्वास वाढविते.








**जालना :** महिला दिनाच्या निमित्ताने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात विविध उपक्रम राबविल्या गेले. यानिमित्ताने जालना शहराच्या महापौर वंदनाताई मगरे यांनीही या उपक्रमाला भेट देऊन महिला दिनाच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्या म्हणाल्या भारतीय राज्यघटनेने सर्वांना समान संधी दिली आहे. लोकशाहीमध्ये आपण एकमेकांचा सन्मान करायला हवा. मी आज जालना शहराची महापौर झाले ते भारतीय संविधानामुळेच. ही संविधानाची ताकद आहे. अगदी सर्व सामान्य पार्श्वभूमी असतानाही अनेकांनी भारतीय संविधानाच्या तरतुदीमुळे आपला सर्वांगीण विकास केला आहे.. संविधान हे आपल्या जगण्याला बळ देते. आपणाला आत्मविश्वास देते. जालना शहरातील विविध सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी आपण पुढाकार घेऊ. स्त्रियांना सुरक्षित अशा पद्धतीचे हे शहर निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करण्यासाठी पुढे आले पाहिजे. आज शहरात विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्याची सोडवणूक करण्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे असेही ते म्हणाल्या.यानिमित्ताने इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी जालनाच्या माजी संचालक प्रा. डॉ. स्मिता लेले यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. उद्योजकीय व्यक्तिमत्व घडविण्यासाठी लागणाऱ्या कौशल्याचा यावेळी त्यांनी उल्लेख केला. कोणतीही निर्मिती करत असताना आत्मविश्वासपूर्वक ती करायला हवी. अपयश आले असले तरी त्यातून नवे काहीतरी आपणाला करता येऊ शकते. म्हणून आपण विविध आव्हाने स्वीकारली पाहिजेत. समकालीन समाजात प्रचंड अशा पद्धतीचे बदल होऊ घातले आहे. त्या बदलाला साजेसे आपले वर्तन असायला हवे. विविध प्रकारचे तांत्रिक बदल होऊ लागले आहे. त्यासाठी नवीन कौशल्य आपणाला शिकायला हवीत. यावेळी त्यांनी उद्योजकीय प्रेरणा याबद्दलही विचार व्यक्त केले. 'Entrepreneurship and beyond.....' या व्याख्यानात त्यांनी उद्योजकतेचे विविध पैलू मांडले आहेत. त्यांनी उद्योजकासाठी '3 एम' मंत्र (Making, Marketing, Making money) आणि यशस्वी होण्यासाठी '4 पी' सूत्र (Passion, Perseverance, Perfection, Positivity) महत्त्वाचे असल्याचे सांगितले. उद्योजकतेमध्ये केवळ IQ (बुद्ध्यांक) पुरेसा नसून, EQ (भावनांक), SQ (अध्यात्मिक अंक) आणि उत्तम PQ (शारीरिक तंदुरुस्ती) यांचे संतुलन आवश्यक आहे. या सादरीकरणात त्यांनी स्त्री आणि पुरुषांच्या कार्यशैलीतील फरकावर प्रकाश टाकला असून, महिलांकडे जास्त चिकाटी (Grit) असल्याचे नमूद केले आहे. शेती आणि अन्नप्रक्रिया उद्योगात (उदा. गजर हलवा किंवा अन्न प्रक्रिया) मूल्यवृद्धी करून 'सर्वसमावेशक वाढ' कशी साधता येईल, हे त्यांनी रंजक उदाहरणांतून स्पष्ट केले. शेवटी, खऱ्या उद्योजकासाठी प्रगतीची कोणतीही सीमा नसते, हे त्यांनी ठामपणे मांडले. निर्भय आणि मुक्त राहायचे आहे मला या भावार्थावर आधारित सत्यप्रिया श्रृंगारे हीने गायलेल्या 'बेखौफ आजाद रहना मुझे' या गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ. प्रेरणा रामटेके यांनी डॉ. स्मिता लेले यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या संयोजक महिला समितीच्या प्रा. डॉ. सुनिता भराडे यांनी प्रास्ताविकात डॉ. सुनिता भराडे यांनी महिला दिवसाच्या संदर्भातील ऐतिहासिक संदर्भाचा आढावा घेतला. स्त्रियांना मानसन्मान आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या विविध संघर्षांचा आढावा यावेळी त्यांनी घेतला. कार्यक्रम उत्तमरीत्या सादर केल्याबद्दल प्राचार्य कविता प्राशर यांनी यांनी सर्वांचे कौतुक केले.यावेळी इतिहासात आपल्या कर्तुत्वाने कर्तबगार गाजविणाऱ्या विविध स्त्रियांचा आविष्कार यावेळी प्रदर्शित करण्यात आला. पल्लवी धनगर हिने झांसीची राणीची भूमिका साकारली त्याबद्दल तिला प्रथम पारितोषिक दिले गेले. समीक्षा कुडके हीने राजमाता जिजाऊची भूमिका साकारली त्याबद्दल द्वितीय पारितोषिक दिले गेले. श्वेता कोकणे हिने सरोजनी नायडू यांची भूमिका साकारली त्याबद्दल तिला तृतीय पारितोषिक देण्यात आले. मानसी काळे हिने महिला दिवसाच्या निमित्त उत्कृष्ट मनोगत व्यक्त केले त्याबद्दल तिला प्रोत्साहनपर बक्षीस दिले गेले. गिरिजा टाकळकर हिने माता रमाबाई आंबेडकर यांची भूमिका साकारली त्याचबरोबर शिवकालीन युद्धकलेचे प्रदर्शन केले त्याबद्दल तिला प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले. सानिया शेख हिने रझिया सुलतान यांची भूमिका साकारली. नेहा शिंदे हिने मुक्ताबाईची भूमिका तर साक्षी पवार हिने राजमाता जिजाऊची भूमिका, भूमिका गावडे हिने ताराबाई, योगिता बरगे हिने अहिल्याबाई होळकर, वेदिका जायभाये आणि वैशाली मील यांनी सावित्रीबाई फुले, वनिता दौड हिने आनंदीबाई जोशी, कृतिका ठेंगणे हिने कमला सोहनी, साधना चव्हाण हिने लता मंगेशकर, ऐश्वर्या खरात हिने प्रतिभाताई पाटील यांची भूमिका साकारली. योगिता बरगे हिने द्रोपदी मुर्मू तर सारिका गरड हिने दिव्या देशमुख यांची भूमिका साकारली. या सर्वांच्या सहभागामुळे स्त्रियांनी विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीला अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मोहिनी रायबागकर यांनी केले. यावेळी बहुसंख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## शाळेतं युद्ध नव्हतं

आमच्या शाळेतं युद्ध नव्हतं.
तिथे फक्त अक्षरांची जुळवाजुळव होती —
"अ" पासून "ज्ञ" पर्यंत
जग समजून घेण्याची.
तिथे आम्हाला
जग कसं वाचायचं
हे शिकवलं जात होतं.
मग सांगा —
आमच्या शाळेवर
बारूद कोणी उधळलं?
आमच्या दप्तरात
ना रणगाडे होते,
ना जनरलांचे आदेश,
ना सूडाचे नकाशे.
शाळेच्या अंगणात
आम्ही धावत होतो —
कोणाला हरवण्यासाठी नाही,
तर मोठं होण्यासाठी.
तिथे ना धर्म होता,
ना राष्ट्रवाद.
तिथे फक्त पेन्सिल होती,
वही होती,
आणि उद्याच्या जगाचं
पहिलं वाक्य लिहिण्याची
लहान, निरागस स्वप्नं होती.
पण जगातील मोठ्या माणसांनी
परिषदांच्या टेबलांवर
नकाशांवर रेषा आखल्या.
आणि त्या रेषाच
आकाशातून बॉम्ब बनून
आमच्या शाळांवर कोसळल्या.
त्या दिवशी भूगोलाने
नकाशावरची चूक
मुलांच्या रक्ताने दुरुस्त केली.
राजकारणाने अक्षरांची हत्या केली.
आणि इतिहासाने
भविष्याच्या छातीत गोळी घातली.
भिंती उडाल्या, फळे तुटली.
खडूंचा धुराळा
बारूदी धुरात हरवला.
घंटीचा आवाज
आकाशात अडकून राहिला.
आणि त्या क्षणी
मानवजातीने स्वतःच्या भविष्यावर
स्वतःच गोळी झाडली.
सांगा —
वर्गखोल्यात कुठलं सैन्य लपलं होतं?
"अ" शिकणाऱ्या हातांनी
कुठल्या युद्धाची घोषणा केली होती?
पेन्सिल धरलेल्या बोटांनी
कुठल्या सीमारेषा आखल्या होत्या?
कोणत्या संसदेत आमच्यावर
मृत्यूचा ठराव पास झाला?
कोणत्या डायरने
शाळेला रणांगण घोषित केलं?
आज घंटी शांत आहे.
दप्तरं राखेत झोपली आहेत.
वहीच्या पानांवर
रक्ताने लिहिलं आहे —
"उद्या पुन्हा शिकू."
पण
उद्या उजाडलाच नाही.
मातीखालून
लहान लहान प्रश्न उगवत आहेत.
ते धर्माचे नाहीत.
ते राष्ट्राचे नाहीत.
ते फक्त माणसाच्या मूर्खपणाचे
जिवंत साक्षीदार आहेत.
ते चिमुरडे विचारतात —
आम्ही काय वाईट केलं तुमचं?
कोणत्या धर्माला दुखावलं?
कोणत्या राष्ट्राला हरवलं?
आम्हाला तर फक्त
मोठं व्हायचं होतं.
फक्त जग समजून घ्यायचं होतं.
आणि फक्त एक दिवस
माणूस व्हायचं होतं.
पण तुम्ही
जगाच्या सर्वात लहान स्वप्नांवर
सर्वात मोठं युद्ध लढलात.
आता भूमीच्या राखेतून
एक आवाज उठतो —
कोवळ्या कळ्यांनी
कुठे तोफ डागली होती तुमच्यावर?
सांगा —
त्या युद्धात कोण जिंकलं?
उत्तर, राख झालेल्या वर्गखोल्यांत
आजही पडून आहे —
त्या युद्धात कोणी जिंकलं नाही.
फक्त मुलांच्या दप्तरांतून
भविष्यच मरण पावलं.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**


**प्रतिनिधी नेमणे आहे**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.**